# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः21.06.2024** **वारःशुक्रवार**

---

1. योगाभ्यास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचा जगभरात उत्साह
3. लोकसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून भर्तृहरी महताब यांची नियुक्ती
4. बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसिना आजपासून दोन दिवसाच्या भारत दौऱ्यावर आणि
5. टी -20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील सुपर एट गटात भारताचा अफगाणिस्तानवर 47 धावांनी विजय

**योगदिवस**

समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी योगाभ्यास उपयुक्त ठरत असून जगभरात, योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनवणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढत आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम जम्मू आणि काश्मीरच्या श्रीनगर येथील शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कॉन्फरन्स सेंटरमध्ये झाला; त्यावेळी ते बोलत होते. जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह विविध मान्यवर या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी मोदी यांनी उपस्थितांसह योगाभ्यास केला. दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन आज संपूर्ण देशभरात तसंच जगभरातल्या अनेक देशांमध्ये उत्साहानं साजरा होत आहे. "स्वतःसाठी आणि समाजासाठी योग" अशी यावर्षीच्या योग दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. आत्मकल्याण आणि सामाजिक एकोपा साधण्यात योगाची असलेली भूमिका याद्वारे अधोरेखित होते. योग दिनाचा प्रचार प्रसार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व सरपंचांना पत्र लिहून, तळागाळातील लोकांना योगप्रसारात सहभागी करून घेण्याचं आवाहन केलं आहे.

**लोकसभा-हंगामी अध्यक्ष**

भाजपाचे खासदार भर्तृहरी महताब यांची लोकसभेच्या हंगामी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ही नियुक्ती केली असल्याची माहिती, केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली आहे. लोकसभेच्या अध्यक्षांची निवड होईपर्यन्त, महताब अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडतील असं रिजिजू यांनी संदेशात म्हंटलं आहे. सदस्यांना शपथ घेण्याच्या कामी हंगामी अध्यक्षांना मदत करण्यासाठी घटनेच्या कलम 99 अन्वये सुरेश कोडीकुन्नील, टी बालु, राधा मोहन सिंग, फग्गन सिंग कुलस्ते आणि सुदीप बंदोपाध्याय यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**गहू साठा**

देशांतर्गत बाजारात गव्हाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती केंद्र सरकारने काल दिली. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींचा आढावा घेण्यासाठी काल  केंद्रीय गृह आणि सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीगटाच्या बैठकीत, गव्हाचा साठा आणि त्याचे दर याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. गेल्या वर्षीच्या रब्बी हंगामातील, 262 लाख मेट्रिक टन गव्हाच्या खरेदीच्या तुलनेत यावर्षीच्या रब्बी हंगामात, 266 लाख मेट्रिक टन गहू खरेदी करण्यात आला आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली आणि इतर कल्याणकारी योजनांची आवश्यकता पूर्ण केल्यानंतर, अंदाजे 184 लाख मेट्रिक टन इतका गव्हाचा पुरेसा साठा गरजेनुसार बाजारात उतरवण्यासाठी उपलब्ध आहे, अशी माहिती मंत्रालयाने दिली.

**<u>मिफ्फ-सांगता</u>**

अठराव्या मिफ्फ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची आज सांगता होत आहे. गेल्या 15 जून रोजी सुरू झालेल्या या महोत्सवाची सुरुवात चार्ली हेमल्टॉन जेम्स दिग्दर्शित, 'बिली अँड मॉली : ॲन ओटर लव्ह स्टोरी' या लघुपटाने झाली. या वर्षीच्या चित्रपट महोत्सवात, 59 देशांमधील, 61 भाषांतील 314 चित्रपट दाखवण्यात आले. तसंच 8 जागतिक, 5 आंतरराष्ट्रीय, 18 आशिया आणि 21 चित्रपट देशस्तरावर प्रदर्शित करण्यात आले. जगभरातील चित्रपट देशभरातील जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचवेत यासाठी, मुंबई व्यतिरिक्त, दिल्ली, कोलकाता, पुणे आणि चेन्नई येथे देखील चित्रपटांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं होतं. या चित्रपट महोत्सवात, पहिला-वहिला डॉक फिल्म बाजार आयोजित करण्यात आला. त्याचप्रमाणे, परिसंवाद आणि ॲनिमेशन आणि VFX या विषयांवर कार्यशाळांचं आयोजनही करण्यात आलं होतं.

**<u>यूजीसी-नेट परीक्षा</u>**

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसी तर्फे यावर्षी घेण्यात आलेल्या नेट परीक्षेसंदर्भात केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे. या परीक्षेत गैरव्यवहार झाल्याच्या, शिक्षण विभागाच्या सचिवांकडून करण्यात आलेल्या तक्रारीच्या आधारावर अज्ञात आरोपीविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या महिन्याच्या 18 तारखेला दोन सत्रामध्ये, देशभरातील विविध शहरांमध्ये  ही परीक्षा घेण्यात आली होती.

**<u>नीट-पूल</u>**

वैद्यकीय प्रवेशासाठीची राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा- नीट 2024 संबंधीत मुद्यांची चौकशी करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केली आहे. ते काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. राष्ट्रीय परीक्षा परिषद आणि तिच्या कार्यप्रणालीत आणखी सुधारणा करण्यासाठी या समितीकडून शिफारसी अपेक्षित असल्याचं प्रधान यांनी सांगितलं.

**<u>बांग्लादेश पंतप्रधान दौरा</u>**

बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसिना आजपासून दोन दिवसाच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची त्या भेट घेणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत त्यांची द्विपक्षीय बैठक होईल. शेख हसीना  परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची देखील भेट घेणार आहेत. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर प्रथमच परदेशाच्या पंतप्रधान द्विपक्षीय चर्चेसाठी भारतात येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नवनिर्वाचित केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शपथविधीसाठी देखील शेख हसीना यांना आमंत्रित करण्यात आलं होतं.

**<u>इस्रायल-हिजबुल्ला</u>**

हिजबुल्लाचा कमांडर दर्जाचा सैनिकी अधिकारी काल केलेल्या हवाई हल्ल्यात ठार झाल्याच्या वृत्ताला इस्राएलने दुजोरा दिला आहे. फादेल इब्राहिम असं या सैनिकी अधिकाऱ्याचं नाव आहे, त्याची देर किफा परिसरात हत्या करण्यात आली. दरम्यान, इस्त्रायलींना त्यांच्या घरी परत जाण्यापासून रोखण्यासाठी हल्ले सुरूच राहतील असं इराणचं समर्थन असलेल्या दहशतवादी गटाच्या नेत्यांनी म्हटले आहे.

**<u>निवडणूक तक्रारी</u>**

2024 च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निकाल जाहीर झाल्यानंतर, ई व्ही एम यंत्राची पडताळणी करण्यासाठी काही राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून निवडणूक आयोगाकडे आठ अर्ज दाखल झाले आहेत. महाराष्ट्रातून अहमदनगर लोकसभा मतदारसंघातले पराभूत उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या अर्जाचाही यात समावेश आहे. तसंच तामिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश, हरियाणा आणि छत्तीसगड मधील उमेदवारांनीही या अंतर्गत अर्ज केले आहेत. आंध्र प्रदेश आणि ओडिशामधील राज्य

विधानसभेच्या निवडणुकांसंदर्भात देखील याच संदर्भात तीन अर्ज प्राप्त झाले आहेत. याचिका दाखल होऊन, त्याची पडताळणी झाल्यावर, चार आठवड्यांच्या आत मतदान यंत्रांची तपासणी सुरू होईल असं निवडणूक आयोगाने म्हंटलं आहे.

**पुणे विमानतळ**

महाराष्ट्रातील पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याबाबत केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना पत्र लिहिलं आहे. तसंच धावपट्टी विस्तारासाठी सर्वेक्षण करण्याकरता भारतीय हवाई दलाला सूचना द्याव्यात, अशी विनंतीही केली आहे. या संदर्भात मोहोळ येत्या सोमवारी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**चिनाब पूल**

भारतीय रेल्वेनंजम्मू आणि काश्मीर मध्ये बांधलेल्या जगातील सर्वात उंच पूलावर काल आठ डब्यांच्या मेमूरेल्वेची यशस्वी चाचणी घेतली. यामुळे काश्मीर मधील रियासी ते बारामुल्ला पर्यंतच्या रेल्वे सेवेला सुरुवातझाली आहे. रामबाण जिल्ह्यातील संगलदन ते रियासी या 46 किलोमीटरच्याविद्युत मार्गावर ताशी 40 किलोमीटर वेगाने ही रेल्वे चाचणी घेण्यात आल्याचं रेल्वेमंत्रालयानं सांगितलं. डुग्गू आणि बक्कल स्थानकांदरम्यान चिनाब नदीवरील बांधलेल्याया जगातील सर्वात उंच रेल्वे पूलावरून पहिल्यांदाच रेल्वे पूर्ण क्षमतेनं धावली आहे.उधमपूर-श्रीनगर-बारमुल्ला रेल्वे जोडणी प्रकल्पांतर्गत असलेल्या बनीहाल-संगलदनभागाच्या 48 किलोमीटर रेल्वे मार्गाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्तेगेल्या 20 फेब्रुवारी रोजी झालं होतं.

**केजरीवाल-जामीन**

दिल्लीचे मुख्यमंत्री तसंच आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळ्याशी संबंधित प्रकरणामध्ये दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू कोर्टाने काल जामीन मंजूर केला. याआधी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी त्यांना अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. मात्र, पुन्हा त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात आली होती. केजरीवाल यांच्या जामीनाला 48 तासांची स्थगिती देण्याची इडी ने केलेली मागणी न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणी पुढील युक्तिवाद आज न्यायाधीशांसमोर करता येतील, असं न्यायालयाने म्हंटलं आहे.

**दिल्ली उष्णतेची लाट**

दिल्लीमध्येसध्या उष्णतेची लाट आली आहे. गेल्या 24 तासात उष्माघातामुळे सफदरगंज रुग्णालयात 6 रुग्ण भरती झाले होते. त्यापैकी दोनरुग्णांचा मृत्यू झाला आहे तर तीन जणांची प्रकृती चिंताजनक आहे. उष्णतेच्या त्रासाशीसंबंधित 47 रुग्ण सध्या रुग्णालयात दाखल असून त्यापैकी 29 जणांची प्रकृती चिंताजनकआहे. 16 जून पासून उष्णतेशी संबंधित आजारांमुळे 62 रुग्ण दाखल झाले असून आजपर्यंत 24 जणांचामृत्यू झालं आहे. आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्यांना उष्णतेची लाट येण्यापूर्वी यासंदर्भातप्रशिक्षण दिलं असल्याचं रुग्णालयानं सांगितलं.

**क्रिकेट**

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एटमधील सामन्यात काल भारतानं अफगाणिस्तानचा 47 धावांनी पराभव केला. बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं अफगाणिस्तानसमोर 182 धावांचं आव्हान ठेवलं होतं, पण अफगाणिस्तानचा संघ निर्धारित 20 षटकांत केवळ 134 धावाच करू शकला. 28 चेंडूत 53 धावा करणारा भारताचा सूर्यकुमार यादव सामनावीर ठरला. दरम्यांन, आज सुपर एट मधीलच दूसरा सामना नॉर्थ साऊंड इथे, बांग्लादेश आणि ऑस्ट्रेलिया संघादारम्यान खेळला जात आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.